# उल्हासनगर महानगरपालिका, मालमत्ता कर विभाग

ULHASASNAGAR MUNICIPAL CORPORATION, PROPERTY TAX DEPT.

मुख्यकार्यालय, तळमजला, उल्हासनगर-४२१ ००३ जिल्हाठाणे, महाराष्ट्र

Head Office, Ground Floor,Ulhasangar-४२१ ००३ Dist Thane, Maharashtra

Tel No:- ९५२५१-२७२०११६ /१२५ Ext. No. २३८ Fax No:- ९५२५१-२७२०१०४


जा. क्र./उमपा/करवि/यु.८/७५८/२०२३ दिनांक ०८/०४/२०२४

**विषय:-** मालमत्ता क्र. 58DI012315500 (जुना क्र.58/2042) करीता मालमत्ता कर वसुलीच्या प्रयोजनार्थ कर भरण्यास प्रथमत: पात्र व्यक्ती म्हणुन श्रीम. अंजली अब्दुल शेख अशी नोंद करण्यात आली आहे. ती रदद करुन पुर्वीप्रमाणे असलेल्या नावाची नोंद पुर्ववत करणे बाबत.

**प्रस्तावना,**

उल्हासनगर महानगरपालिका कर आकारणी पुस्तकात करपात्र मालमत्ता क्र. 58DI012315500 (जुना क्र.58/2042) अन्वये नोंद असलेल्या मिळकती करीता मालमत्ता कर वसुलीच्या प्रयोजनार्थ कर भरण्यास प्रथमत: पात्र जबाबदार व्यक्ती म्हणुन **श्री. विनोदकुमार भुलुलाल पाल** अशी नोंद होती.

**२)** उक्त मिळकती करीता वर्ष २०२१-२०२२ मध्ये जा. क्र./उमपा/करवि/यु८/७१/२१, दिनांक ०९/०६/२०२१ रोजीचे नाव हस्तांतरण आदेशान्वये मालमत्ता कर वसुलीच्या प्रयोजनार्थ कर भरण्यास प्रथमत: पात्र जबाबदार व्यक्ती म्हणुन **श्रीम. अंजली अब्दुल शेख** अशी नोंद करण्यात आली आहे.

सदर नावाची नोंद खालिल कागदपत्राच्या आधारे करण्यात आली आहे.

१) श्री. विनोदकुमार मोतीलाल पाल (लिहुन देणार) व श्रीम. अंजली अब्दुल शेख (लिहुन घेणार ) यांचे दरम्यानचे नोटरी केलेले कायम खरेदी खत दिनांक २८/०५/२०२१ ची छायांकित प्रत.

२) नोटरी केलेले हमीपत्र/ताबापावती (अ. क्र. जी-५/९०, दिनांक २८/०५/२०२१) ची प्रत.

३) नोटरी केलेले हमीपत्र (अ. क्र. जी-५/९१, दिनांक २८/०५/२०२१) ची प्रत.

४) दिनांक ३१/०५/२०२१ रोजीचा बिंत्तबातमी या वर्तमानपत्रात प्रसिध्द केलेली नोटीस. इत्यादी कागदपत्र सादर केली आहेत.

**३)** सदर नोंदीबाबत अर्जदार श्री. विनोदकुमार भुल्लुलाल पाल रा. सी-९२६, साईनाथ नगर, उल्हासनगर-५ यांनी ना. सु. केंद्र टोकन क्र.41202400007201, 8518, दि. 12/03/2024 व दि. 26/03/2024 रोजीच्या हरकत अर्जान्वये मनपा कर आकारणी पुस्तकात करपात्र मालमत्ता क्र. 58DI012315500 (जुना क्र.58/2042) अन्वये नोंद असलेली मिळकत ही मी श्रीम. सुनिता रविंद्रकुमार पाल यांचेकडुन दिनांक २४/०६/२०१४ रोजी नोटरी खरेदी खतान्वये कायवस्वरुपी विकत घेतली आहे. त्यानुसार माझे नावे मनपा दप्तरी कर पावतीही येत होती. परंतु सद्यस्थितीत कर पावती ही श्रीम. अंजली अब्दुल शेख यांचे नावे येत आहे. सदर नावाची नोंद ही चुकीच्या कागदपत्राच्या आधारे करण्यात आली असल्याने श्रीम. अंजली अब्दुल शेख ही नोंद रद्द करुन पुर्वीप्रमाणे श्री. विनोदकुमार भुलुलाल पाल अशी नोंद पुर्ववत करणेस विनंती केली आहे.

सदर हरकती सोबत खालिल कागदपत्र सादर केली आहेत.

१) श्रीम. सुनिता रविद्रकुमार पाल (लिहुन देणार) व श्री. विनोदकुमार भुल्लुलाल पाल (लिहुन घेणार) यांचे दरम्यानचे नोटरी केलेले खरेदी खत नं. १०६/२६६, दिनांक २४/०६/२०१४ ची छायांकित प्रत.

२) श्री. विनोदकुमार भुल्लुलाल पाल यांचे नावे असलेला मनपाकडील जा. क्र./उमपा/करवि/यु८/१३०/२०१५, दिनांक ०२/०६/२०१५ रोजीचा नाव हस्तांतरण आदेशाची प्रत. इत्यादी कागदपत्र सादर केली आहेत.

**४)** विषयांकीत प्रकरणी संबंधित विभागाचे कर निरीक्षक यांनी संदर्भित मिळकतीची प्रत्यक्ष पाहणी केली असुन पुढील प्रमाणे अहवाल सादर केला आहे.

१) मनपा कर आकारणी पुस्तकात करपात्र मालमत्ता क्र. 58DI012315500 (जुना क्र.58/2042) अन्वये नोंद असलेल्या मिळकतीचा ताबा श्री. विनोदकुमार भुल्लुलाल पाल यांचेकडे असल्याचे आढळुन आले आहे.

२) तसेच श्रीम. अंजली अब्दुल शेख यांनी श्री. विनोदकुमार मोतीलाल पाल यांचेकडुन विकत घेतलेली मिळकत व श्री. विनोदकुमार भुल्लुलाल पाल यांचेकडील असलेली मिळकत हया दोन्ही मिळकती वेगवेगळया असुन नावामध्ये साम्यता असल्याने नजरचुकीने मालमत्ता क्र. 58DI012315500 (जुना क्र.58/2042) करीता करण्यात आलेली श्रीम. अंजली अब्दुल शेख ही नोंद रद्द करुन पुर्वीप्रमाणे श्री. विनोदकुमार भुलुलाल पाल अशी नोंद पुर्ववत करणे उचित वाटते.

**५)** यास्तव सदर प्रकरणी श्री. विनोदकुमार भुल्लुलाल पाल यांनी दाखल केलेल्या अर्जाच्या अनुषंगाने सदरील मिळकत ही श्रीम. सुनिता रविद्रकुमार पाल यांचेकडुन श्री. विनोदकुमार भुल्लुलाल पाल यांनी दिनांक २४/०६/२०१४ रोजी नोटरी खरेदी खतान्वये विकत घेतल्याचे प्रथम दर्शनी दिसुन येत आहे. तसेच श्रीम. अंजली अब्दुल शेख यांनी श्री. विनोदकुमार मोतीलाल पाल यांचेकडुन नोटरी खरेदी खतान्वये दिनांक २८/०५/२०२१ रोजी विकत घेतल्याचे दिसुन येत आहे.

सदर दोन्ही मिळकती हया वेगवेळया असुन त्यांचे मालमत्ता क्र. 58DI012315500 (जुना क्र.58/2042) व 58DI012385800 (जुना क्र.58/2140) असे आहेत. तसेच मिळकतीची विक्री केलेल्या खरेदी खतामध्ये वरील दोन्ही नावामध्ये साम्यता असल्याने नजरचुकीने मालमत्ता क्र. 58DI012315500 (जुना क्र.58/2042) करीता कर भरण्यास प्रथम पात्र व्यक्ती म्हणुन असलेली श्रीम. अंजली अब्दुल शेख ही नोंद रद्द करुन पुर्वीप्रमाणे श्री. विनोदकुमार भुलुलाल पाल अशी नोंद पुर्ववत करणे उचित वाटते.

६) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदीनुसार उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रातील इमारती व जमिनींवर मालमत्ता कर आकारणी करण्यात येते. मालमत्ता कर वसुलीच्या प्रयोजनार्थ कर देण्यास प्रथमतः पात्र जबाबदार व्यक्तीचे नावाची नोंद आवश्यक आहे. सदरील नोंद फक्त "मालमत्ता कर देण्यास प्रथमतः पात्र व्यक्ती' म्हणुन करण्यात येते. व सदर नोंदीचा मालकी हक्काशी काहीही संबंध नाही.

उक्त तरतुदीच्या व अर्जदाराने दाखल केलेल्या हरकीच्या अनुषंगाने मनपा कर आकारणी पुस्तकात करपात्र मालमत्ता क्र. 58DI012315500 (जुना क्र.58/2042) अन्वये नोंद असलेल्या मिळकती करीता मालमत्ता कर वसुलीच्या प्रयोजनार्थ कर भरण्यास प्रथमत: पात्र जबाबदार व्यक्ती म्हणुन असलेली श्रीम. अंजली अब्दुल शेख ही नोंद वर्ष २०२४-२०२५ पासुन रद्द करुन श्री. विनोदकुमार भुलुलाल पाल अशी नोंद पुर्ववत करणेस शिफारस करण्यात येत आहे.

यास्तव विषयांकीत प्रकरणी मी पुढीलपमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१) अर्जदार यांनी दाखल केलेली हरकत व कागदपत्र पाहता मनपा कर आकारणी पुस्तकात करपात्र मालमत्ता क्र. 58DI012315500 (जुना क्र.58/2042) अन्वये नोंद असलेल्या मिळकती करीता मालमत्ता कर वसुलीच्या प्रयोजनार्थ कर भरण्यास प्रथमत: पात्र जबाबदार व्यक्ती म्हणुन असलेली श्रीम. अंजली अब्दुल शेख ही नोंद वर्ष २०२४-२०२५ पासुन रद्द करुन श्री. विनोदकुमार भुलुलाल पाल ही नोंद पुर्ववत करण्यात येत आहे.

२) संदर्भित मिळकती करीता मालकी हक्काबाबत वाद असल्यास संबंधितांनी सक्षम प्राधिका-याकडे दाद मागुन मालकी हक्क निश्चित करावा. व त्याची प्रत या कार्यालयास सादर केल्यानंतर उचित कार्यवाही करण्यात येईल.

(जेठानंद करमचंदानी)
कर निर्धारक व संकलक
उलहासनगर महानगरपालिका

प्रति,

१) मे कोल्ब्रो गृप, नागपुर, यांना योग्य त्या कार्यवाहीसाठी
२) श्री. विनोदकुमार भुल्लुलाल पाल रा. सी-९२६, साईनाथ नगर, उल्हासनगर-५
३) श्रीम. अंजली अब्दुल शेख रा, .ब्लॉक नं. सी-९२६, साईनाथ नगर, उल्हासनगर-५

Shri. Vinodkumar Bhulular Pal

8-4-24